वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. राजेश वामन सोनावणे

मु.पो. तेटघर, ता. महाड, जि. रायगड

- स्वतःची जमिनधारणा कमी असल्याने दुस-याची जमिन भाडेपट्टीने करुन गेल्या १५ वर्षांपासून आधुनिक व प्रायोगिक तत्वावरील शेती व्यवसाय.
- तृणधान्य व फळझाडांसाठी हिरवळीचे खताचा वापर तसेच संकरीत/ सुधारीत बियाणांचा वापर करुन दरवर्षी बियाणे बदल
- डोंगराळ व माळरान जमिनीत प्रायोगिक तत्वावर झेंडू लागवड.
- तांबडा भोपळा व भेडी एक आड एक अशी लागवड करुन एकरी १२०० किलो भेंडी व ३००० किलो भोपळा इतके उत्पादन .
- कुक्कुटपालन व शेळीपालन हा शेतीपूरक व्यवसाय करुन शेळयांच्या लेंडयापासून गांडूळ खत निर्मिती.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. शरद गणपत धुरी

मु.पो. झाराप, ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

- एकूण जमिनधारणा ६ एकर असून रोहयो फळबाग योजनेंतर्गत फळपिकांची लागवड केली असून अकेशियाच्या ३२०० झाडांची लागवड.
- भात शेतीमध्ये चार सूत्री तंत्रज्ञान वापरुन अधिक उत्पादन.
- जलसंधारणाकरीता फळबाग लागवड केलेल्या डोंगर उतारावर सलग समतल चर घेतल्याने विहिरीच्या पाण्याच्या पातळीत वाढ .
- दुग्धव्यवसाय, शेळीपालन व मधुमक्षिका पालन इ. शेतीपूरक व्यवसाय.
- कृषि विद्यापीठे, कृषि संलग्न संस्था, कृषि प्रदर्शने, शेतकरी मेळावे यांना वेळोवेळी भेट देवून अद्यावत माहिती प्राप्त करुन घेण्याकडे कल.
- सन २००६ मध्ये तालुका पातळीवरील भात पिक स्पर्धेत प्रथम क्रमांक तसेच सन २००७ मध्ये जिल्हा पातळीवरील भात पिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. मोहन तुंबडू पाटील

मु.पो.बोरदे, ता. तळोदा, जि. नंदूरबार

- अति दुर्गम भागातील शेतीस आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन उत्पादनात भरीव वाढ.
- जमिनीच्या आरोग्य पत्रिकेप्रमाणे एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापनाचा अवलंब.
- गांडूळ खताचे स्वतःचे युनिट उभारुन सेंद्रिय खत निर्मिती.
- पपई, केळी, ऊस, मिरची या पिकांची लागवड करुन विक्रमी उत्पादन.
- कृषि विभागाच्या विविध पातळीवरील पिक स्पर्धेत सहभागी होवून गावातील/परिसरातील शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन.
- शेतीविषयक विविध प्रकाशने वाचून आणि कृषि विभाग व कृषि विज्ञान केंद्राचे माध्यमातून नियमितपणे संवाद/चर्चा घडवून परिसरातील शेतक-यांना शेतीसाठी उद्युक्त करणे.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. अरूण बबनराव पवार

मु. पो. पवारवाडी (रावळगाव), ता. मालेगाव, जि. नाशिक

- स्वतः उच्च पदवीधर असून शेतीत नवनवीन प्रयोग राबविण्याची आवड असल्याने कश्यप वृषभ ग्रुपची स्थापना
- पिक फेरपालट, सापळा पिक पध्दत, फेरोमन ट्रॅप्स, गांडूळ खत, व्हर्मीवॉश, आच्छादन वापर, सूक्ष्म सिंचन या तंत्रज्ञानाचा सुरेख मेळ घालून सेंद्रिय पध्दतीने शेती
- सन १९९९ मध्ये सेंद्रिय शेतीचे प्रमाणिकरण व सन २००८ मध्ये डाळींब पिकासाठी संपूर्ण देशातून पहिले ग्लोबल गॅप प्रमाणिकरण करुन सेंद्रिय डाळींब परदेशात पाठविण्याचा मान
- सूक्ष्म सिंचनाचा वापर करुन कलिंगडाचे एकरी ३० टन व शेडींग नेटमधील टोमॅटोचे एकरी ३२ टन उत्पादन
- दूरदर्शन, दूरचित्रवाहिनी इ. चे माध्यमातून शेतक-यांना सततचे मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. जालिंदर देवबा सुळ

मु. पो. मोरोची, ता. माळशिरस, जि. सोलापूर

- एकूण १३.४४ हेक्टर जमिन असून त्यापैकी केळी १२ एकर, डाळींब ४ एकर व नारळाची १०० झाडे आणि आंब्याच्या ४० झाडांची लागवड.
- सिंचनासाठी ठिबक व तुषार सिंचनाचा वापर
- शेतीला जोडधंदा म्हणून संकरीत गायी म्हशी, खिलार गायी व शेळयामेंढया पाळल्यात
- जनावरांचे मलमूत्र एकत्र करुन त्यावर बायोगॅस संयंत्रची उभारणी करुन घरातील स्वयंपाक व विजेसाठी वापर
- उतीसंवर्धनाचा अवलंब करुन केळी लागवड केल्याने एकरी रु. ३.०० लाखापर्यंत उत्पन्न
- ऊस पिकात कांदा व हरभ-यासारखी आंतरपिके घेतल्याने वार्षिक उत्पन्नात भरघोस वाढ
- खडकाळ व मुरमाड जमिन लागवडीखाली आणून शेतीबांधाच्या कडेने साग, सुबाभूळ, निलगिरी, नारळ, आंबा, चिंच, चिकू यासारख्या फळझाडांची लागवड

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. बाबासाहेब भाऊराव हासे

मु.पो. इंदोरी, ता. अकोले, जि. अहमदनगर

- एकूण जमिनधारणा १.३० हे. असून विविध पिके व फळझाडे आधुनिक पध्दतीने लागवड करुन फळबागांमध्ये आंतरपिके घेतल्याने अधिकाधिक उत्पन्न
- सुधारीत बियाणे, शेतीपयोगी अवजारे, ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब याबाबतचा प्रचार व प्रसार सातत्याने करणे
- झेंडू पिकाचे विक्रमी उत्पादन घेतल्याने नामधारी कंपनी व होल ॲग्रो कंपनीतर्फे सन्मानपत्र देवून गौरव
- आत्मसात केलेले तंत्रज्ञान शेतक-यांपर्यंत पोहचवून परीसरातील शेतक-यांच्या उत्पन्नात अधिक भर पाडण्यास सक्रिय मदत
- कृषि क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल सन २००८-०९ मध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेच्या वतीने सन्मानित

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. शामराव पांडुरंग देसाई

मु.पो. शिरोली दुमाला ता. करवीर, जि. कोल्हापूर

- धारण केलेले क्षेत्र ३.६० हे. असून त्यामध्ये भात, ऊस, केळी, भाजीपाला तसेच चा-यासाठी मका, कडवळ व ०.४० हे. क्षेत्रावर आंबा फळपिकाची लागवड
- ऊसाच्या पाचटापासून उत्तम प्रकारचे कंपोस्ट खत तयार करुन त्याचा वापर व माती परिक्षणानुसारच रासायनिक खतांचा वापर
- स्वतःचे गावात दोन कृषि विज्ञान मंडळांची स्थापना
- कृषिविषयक कामासाठी जिल्हा/राज्य पातळीवर वेगवेगळे आठ पुरस्कार व प्रमाणपत्रे प्राप्त तसेच राज्य पातळीवर भात पिक स्पर्धेत द्वितीय क्रमांक
- नविन तंत्रज्ञान अवलंबण्यासाठी व त्याचा अभ्यास करण्यासाठी वेगवेगळया मासिकांचे/दैनिकांचे सभासद असून ब-याच कृषिविषयक ग्रंथांचा संचय

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. दत्तात्रय बापूराव ननवरे

मु.पो. राजाळे, ता. फलटण, जि. सातारा

- धारण केलेले क्षेत्र ५.६१ हे. असून त्यामध्ये आंबा, चिंच, सिताफळ, केळी इ. फळपिकांची लागवड
- पिकांचे नियोजन व बाजारपेठेचा अभ्यास करुन पिके घेत असल्याने आर्थिक उत्पन्नात वाढ
- शेतीपूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय करीत असून ५० गायी, ८ म्हशी व ६० शेळया आहेत.
- एकूण ३००० लिटर क्षमतेचे दुध संकलन केंद्र असून जनावरांचा अद्ययावत गोठा.
- महाराष्ट्र कृषि व फलोत्पादन माहिती तंत्रज्ञान अभियानाचे संघटक असल्याने शेतक-यांना मार्गदर्शनासाठी चर्चासत्र, मेळावे इ. चे आयोजन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री.विष्णू नारायण घोडके

मु.पो. पिंपळखुटा, ता.जि. औरंगाबाद

- धारण केलेले क्षेत्र १०.०७ हे. असून ७.६० हे. क्षेत्रावर डाळींब, ०.४० हे. क्षेत्रावर द्राक्ष/मोसंबी व उर्वरीत क्षेत्रावर कापूस, बाजरी, तूर, हरभरा इ. पिकांची लागवड
- एकूण ३ विहिरी व १.५० कोटी लिटर क्षमतेचे सामूहिक शेततळे
- शेती व्यवसायाबरोबर दुग्धव्यवसाय, गांडूळ खत प्रकल्प व बायोगॅस प्रकल्प उभारणी
- विविध पिकांचे बिजोत्पादन घेतल्याने आर्थिक उत्पन्नात भरीव वाढ
- कृषि विज्ञान केंद्र औरंगाबाद/जालना येथे नियमित भेट देवून नविन तंत्रज्ञानाच्या माहितीचा अवलंब
- स्वतःचे प्रक्षेत्रावर शेतकरी मेळावे, शेतीशाळा आयोजित करुन परीसरातील शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन --- योग्य मार्गदर्शनामुळे परीसरातील ६५ ते ७० शेतक-यांनी बायोगॅस संयंत्राची उभारणी व १० ते १२ शेतक-यांनी सामूहिक शेततळे उभारणी केली.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. विजय रामदास चव्हाण

मु. पो.नंदापूर, ता. जि. जालना

- धारण केलेले क्षेत्र ४४.९६ हे. असून सदर क्षेत्रात द्राक्ष, सिताफळ इ. फळपिके व इतर पिकांची लागवड
- द्राक्षापासून बेदाणे निर्मिती तसेच काढणी पश्चात तंत्रज्ञान अवलंब करुन द्राक्षाच्या बिगर हंगामी विक्रीचे व्यवस्थापन
- स्वतःचे प्रक्षेत्रावर शेतक-यांसाठी प्रशिक्षण आयोजित करुन अत्याधुनिक तंत्रज्ञानाची माहिती प्रात्यक्षिकाद्वारे शेतक-यांना उपलब्ध करुन देणे
- शेतात १.५० लिटर क्षमता असलेले दोन शेततळे उभारुन त्यामध्ये मत्स्यव्यवसायाचे प्रतिवर्षी रु. ६००००/- इतके उत्पन्न
- प्रति वर्षी ८० मे. टन गांडूळ खताचे उत्पादन करुन जमिन सुधारणेसाठी वापर
- महाराष्ट्र राज्य सिताफळ उत्पादक संघाचे सदस्य

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. आनंद धोंडीराम पवार

मु.पो. हरंगुळ (खुर्द), ता. जि. लातूर

- धारण केलेले क्षेत्र ६.२४ हे. असून त्यापैकी ४.०० हे. बागायत व २.०० हे. जिरायत .
- सन २००६-०७ मध्ये रोपवाटिकेची उभारणी करुन केशर आंब्याची ३५००० व दिनकर जातीच्या अंजिराची २०००० कलमे तयार.
- ठिबक सिंचनाचा अवलंब करुन आले पिकाची लागवड.
- सन २००२-०३ मध्ये ऊस पिक स्पर्धेत सहभागी होवून एकरी ७५.०९ मे. टन ऊस उत्पन्न घेवून प्रथम क्रमांक.
- सर्व पिकांचे सिंचनासाठी ठिबक व तुषार सिंचनाचा अवलंब.
- पावसाचे पाणी वाया जावू नये म्हणून वसंत बंधारा व सिमेंट बंधा-याचे काम शासकीय योजनेतून केले.
- परीसरातील शेतक-यांसाठी अभ्यास दौ-याचे आयोजन करुन शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. मारोतराव पुंडलिकराव देशमुख

मु. पो. पार्डी (म), ता. अर्धापूर, जि. नांदेड

- संयुक्त कुटुंबाच्या ९.०० हे. क्षेत्रावर संकरीत ज्वारी, तूर, कापूस, सोयाबीन व ऊस पिकाची आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करुन लागवड
- ऊती संवर्धनाचा अवलंब करुन केळीची लागवड तसेच गांडूळ खत व बायोगॅस प्रकल्प उभारणी
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय
- कृषि क्षेत्राबरोबरच सामाजिक व शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभाग
- कृषि क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल सन २००७-०८ मध्ये जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून कृषिनिष्ठ पुरस्कार प्रदान

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. संतोष सुरेशपंत तनपुरे

मु. घोडगाव, पो. कविठा बु., ता. अचलपूर, जि. अमरावती

- हलक्या जमिनीमध्ये रामफळ व जांभूळ फळपिकांची लागवड करुन शेतीच्या बांधावर गवत लागवड
- सन १९९१ मध्ये संत्रा पिकाची लागवड करुन मूलस्थानी जलसंधारणाकरीता शेताच्या कडेस चर काढले.
- सुधारीत आणि संकरीत बियाणांचा वापर करुन पिक संरक्षणाकरीता फेरोमन/लाईट ट्रॅप्सचा वापर
- परीसरातील शेतक-यांना किड व रोग याबाबतचे मार्गदर्शन
- फळपिकांसाठी तुषार व ठिबक सिंचन पध्दतीचा वापर
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्धव्यवसाय तसेच गोबरगॅस संयंत्र आणि निर्धार चूलीचा वापर

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. महादेव बळीराम डाबरे

मु. पो. वरवट बकाल, ता. संग्रामपूर, जि. बुलढाणा

- धारण केलेले क्षेत्र ७.४० हे. असून त्यामध्ये केळी, संत्रा, सिताफळ, गहू, कापूस, हरभरा, तूर व सोयाबीन इ. पिकांची आधुनिक पध्दतीने लागवड
- एक हेक्टर क्षेत्रावर सागाची लागवड
- ट्रॅक्टरच्या सहाय्याने १० एकर क्षेत्राचे सपाटीकरण करुन बांधबंदिस्ती व वनराई बंधा-याद्वारे मृद व जल संधारणाच्या उपक्रमाची यशस्वीता.
- विविध भाजीपाला पिकांचे उत्पादन करुन स्थानिक बाजारात विक्री
- जोडधंदा म्हणून बहुउद्देशिय मळणी यंत्राद्वारे परीसरातील शेतक-यांच्या पिकांची मळणी
- परीसरातील शेतक-यांसाठी चर्चासत्रे व सहली आयोजित करुन वेळोवेळी मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. होमेश्वर सिताराम परशुरामकर

मु. खाडीपार, पो. पांढरी, ता. सडक अर्जूनी, जि. गोंदिया

- धारण केलेले क्षेत्र ७.६२ हे. असून संपूर्ण बागायती
- सन १९८५ साली सरपंच पदावर असताना गावातील विकासाची व शेतीविषयक कामे करुन पंचायत राजचे प्रशिक्षण
- शेतजमिनीचा पोत कायम राखण्यासाठी हिरवळीचे खताचा वापर
- खरीप भात पिकाची उत्पादकता जिल्हा सरासरीपेक्षा १७५ टक्के जास्त.
- स्वतःकडे बायोगॅस संयंत्र, ट्रॅक्टर, तुषार सिंचन संच व फर्टीलायझर ब्रॉडकास्टर आहे.
- अतिदुर्गम भागामध्ये राहूनही इतर शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. यादव दसरूजी मेश्राम

मु. पो. लवारी, ता. साकोली, जि. भंडारा

- एकूण जमीनधारणा १.९८ हे. असून शेतात नवीन प्रयोग घेवून जास्तीत जास्त उत्पादन घेण्याकरीता सतत प्रयत्नशील
- भात पिकाव्यतिरिक्त मसाला पिके व भाजीपाला पिकांची लागवड करुन जास्तीत जास्त उत्पन्न
- औषधी व सुगंधी वनस्पती या विषयाचे प्रशिक्षण घेवून औषधी वनस्पतींची लागवड तसेच बांधावर गिरीपुष्पाची लागवड
- रासायनिक खताचा वापर कमी करुन सेंद्रिय खताचा जास्तीत जास्त वापर
- सन २००५-०६ पासून श्री पध्दतीने भात पिकाची लागवड.
- सन २००८-०९ मध्ये तालुका पातळीवरील पिक स्पर्धेत भाग घेवून भात पिकाचे जिल्हयातून प्रति हे. १००.८० क्विं. उत्पादन घेवून प्रथम क्रमांक

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. जितेंद्रसिंग झुलालसिंग राजपूत

मु. पो. भोणे, ता.जि. नंदूरबार

- एकूण ३.७५ हे. क्षेत्रावरील जमिन सपाटीकरण व बांधबंधिस्ती करुन वाहितीखाली आणली.
- फळपिके, भाजीपाला व आले पिकाची लागवड करुन भरघोस उत्पन्न
- आवळा फळबागेमध्ये कापूस या आंतरपिकाची लागवड
- सन २००८ पासून सेंद्रिय शेतीस सुरुवात करुन गांडूळ खत प्रकल्प उभारणी
- सन २००७ मध्ये कपाशी प्रति हेक्टरी ५० क्विं. व सन २००८ मध्ये गहू पिक प्रति हेक्टरी ४५ क्विं. उत्पादन घेवून शासनाचे तालुका पातळीवरील पिक स्पर्धेत प्रथम क्रमांकाचे बक्षिस
- नंदूरबार येथील दैनिक नंददर्शन या वृत्तपत्र माध्यमातून शेतीविषयक अनुभवाचे तसेच सामाजिक, राजकीय स्वरुपातील लेखांद्वारे समाज प्रबोधनाचे काम

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. प्रतापराव रघुनाथ धोर्डे

मु. पो. डोणगाव, ता. वैजापूर, जि. ओरंगाबाद

- संपूर्ण जमिन सपाटीकरण करुन बांधबंधिस्ती केली असून बांधावर गवताची लागवड करुन जैविक बांध निर्मिती
- गोदावरी नदीवरुन लिफ्ट इरीगेशनद्वारे ३० हजार फूट पाईपलाईन करुन सिंचन व्यवस्था
- सर्व फळपिकांसाठी ठिबक सिंचनाचा अवलंब -- १० हे. क्षेत्रावर ठिबक तर ५ हे. क्षेत्रावर तुषार सिंचन
- एकूण ४० गायी, म्हशीचे पशुधन असून दररोज ५०-६० लिटर दूध उत्पादन
- ५० टन क्षमतेच्या कांदा चाळीची आधुनिक पध्दतीने उभारणी
- उत्पादित कृषिमालास योग्य बाजारभाव मिळण्यासाठी एका गोदामाची उभारणी
- परीसरातील शेतक-यांना शेतीविषयक मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

सर्वसाधारण गट

श्री. राजेंद्र नानासाहेब गायकवाड

मु. पो. भुईंज, ता. वाई, जि. सातारा

- एकूण क्षेत्र २.२३ हे. असून भाजीपाला, मसाला पिके व ऊस यासारखी नगदी पिके आहेत.
- उत्पादित भाजीपाला स्वतःचे वाहनातून वाहतूक करुन विक्री
- भाजीपाला लागवडीसाठी बिजप्रक्रिया, ट्रायकोडर्मा, पीएसबी, रायझोबियम, ॲझेटोबॅक्टर इ. जिवाणूंचा वापर
- भाजीपाला पिकासाठी सेंद्रिय घटकाच्या वापराबरोबरच ठिबक/तुषार सिंचन पध्दतीचा वापर
- भूमाता कृषि विज्ञान, शेतीमाल उत्पादन व विकास संस्था, भुईंज संस्थेचे अध्यक्ष
- मुंबई दूरदर्शन व ई टिव्ही तसेच आकाशवाणीवर कृषिच्या विविध विषयावरील मुलाखतीद्वारे शेतक-यांना वेळोवेळी मार्गदर्शन

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. रशिद (विशाल) मोहन गावित

मु.पो.धनराट, ता. नवापूर, जि. नंदूरबार

- एकूण ०.७० हे. क्षेत्र असून गावातील इतरांची शेती भाडयाने अथवा भागीदारी करुन आधुनिक पध्दतीने शेती
- एक डोळा पध्दतीने ऊस लागवड करुन त्यामध्ये आंतरपिक म्हणून भूईमूग पिकाची लागवड .... एकरी २७ ते २८ क्विं. उत्पन्न मिळवून नंदूरबार जिल्हयाची त्या वर्षाची सर्वाधिक उत्पादकता
- सहा वर्षापासून पुसा-१ या बासमती भाताची चारसूत्री पध्दतीने लागवड
- अन्नधान्य उत्पादनाबरोबरच फळबाग लागवड, दुग्धव्यवसाय, शेळीपालन, कुक्कुटपालन इ. पूरक व्यवसाय
- शेतीतून मिळालेल्या उत्पन्नातून ट्रॅक्टर तसेच सुधारीत अवजारांची खरेदी.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. विष्णू लक्ष्मण वरठा

मु. विरे, पो. गोवणे, ता. डहाणू, जि. ठाणे

- एकूण जमीनधारणा ०.५० हेक्टर असून ट्रॅक्टरच्या सहाय्याने जमीन समपातळीत आणून फळझाडांची लागवड
- पाण्याच्या उपलब्धतेकरिता विंधन विहीर खोदली असून शेतातील सर्व कचरा खड्डयात टाकून त्यावर शेण व सुपर फॉस्फेट टाकून तयार झालेल्या खताचा फळझाडासाठी वापर
- पावसाळयात शेतातून वाहून जाणारे पाणी उताराच्या आडव्या दिशेने चर खोदून अडविल्याने विंधन विहीरीचे पुनर्भरण होऊन पाण्याचे पातळीत वाढ
- कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड येथे नियमित भेटी देऊन आत्मसात केलेल्या नवीन तंत्रज्ञानाचा स्वतःच्या शेतात अवलंब
- फळपिकांच्या विविध कलमे/रोपांचे परिसरातील शेतक-यांना मोफत वाटप

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. हेमंत नामदेवराव मगरे

मु.पो.लाडबोरी, ता. सिंदेवाही, जि. चंद्रपूर

- धारण केलेले एकूण क्षेत्र ४ हेक्टर असून संपूर्ण शेती सेंद्रिय पध्दतीने करण्याचा प्रयत्न
- नदीकाठावरील शेतीत नदीच्या पाण्याचा सिंचनासाठी वापर करून आंब्याच्या दशहरी, लंगडा व केशर जातीची लागवड
- आधुनिक पध्दतीने शेती करण्यासाठी यांत्रिक अवजाराचा वापर
- शासनाच्या कुटुंब कल्याण कार्यक्रमात विशेष सहभाग घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यास सहकार्य
- परिसरातील व इतर गावातील शेतक-यांना कृषिविषयक वेळोवेळी मार्गदर्शन
- कृषि विज्ञान केंद्र, सिंदेवाही व डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचेकडून शेती क्षेत्रात केलेल्या कामगिरीबद्दल प्रमाणपत्र देऊन सन्मानित

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. भाऊ नारायण केदारी

मु.पो. दोंदे, ता. खेड, जि. पुणे

- धारण केलेले क्षेत्र ०.२८ हेक्टर असून सिताफळ, आंबा, नारळ, शेवगा या पिकांची लागवड
- शेतीमध्ये संपूर्ण सेंद्रिय खताचा वापर करीत असून गांडूळ खत प्रकल्प उभारणी
- जीवामृत व गांडूळ खताच्या नियमित वापराने बटाटयाचे भरधोस उत्पन्न
- अडूळसा, सब्जा, सतापा, अष्टगंधा, सफेद मुसळी व आवळा यांची लागवड केली असून मागील ३०-३५ वर्षापासून त्याचा उपयोग वेगवेगळया आयुर्वेदिक पध्दतीने उपचार करण्यासाठी करीत असल्याने खेड तालुक्यात आयुर्वेदिक डॉक्टर म्हणून परिचित
- जोडधंदा म्हणून दुग्धव्यवसाय व कुक्कुटपालन
- इंधन बचतीचा पर्याय म्हणून गोबरगॅस बांधणी.

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. रामचंद्र महादू डुकरे

मु.देहगाव (साकुर), पो.वानोळा, ता.माहूर, जि.नांदेड

- एकूण जमीनधारणा ८.४३ हेक्टर असून त्यापैकी २.०० हेक्टर क्षेत्र बागायती व ६.०० हेक्टर जिरायती
- शेतात नाला बांध व मृदसंधारणाचे विविध उपचार करुन आधुनिक शेतीस प्रारंभ
- सर्व पिकांना माती परीक्षणानुसार खताचा वापर व सिंचनासाठी तुषार संचाचा वापर
- शेतीला पूरक व्यवसाय म्हणून दुग्ध व्यवसाय तसेच गोबर गॅस संयंत्राची उभारणी
- शेती व्यतिरिक्त सामाजिक क्षेत्रात हिरीरीने सहभाग.... आपले गांव हागणदारीमुक्त करण्यासाठी अथक प्रयत्न

वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी २००९

आदिवासी गट

श्री. वा-या महारू कोकणी

मु. पो. वासदरे, ता.जि. नंदूरबार

- एकूण ३.६४ हेक्टर क्षेत्र असून त्यामध्ये बांध बंदिस्ती जमीन सपाटीकरण करुन घेतले आहे.
- फळपिके तसेच इतर पिकांची लागवड करुन जिल्हयांत प्रथमच शेतामध्ये फुलबाग करून फुलशेतीचा प्रयोग यशस्वी करून दाखविला
- सेद्रिय खतांचा नियमितपणे वापर
- तालुका पातळीवरील पिक स्पर्धेत सहभागी होऊन सन २००८ मध्ये कपाशी व सन २००९ मध्ये गहू पिकांच्या उत्पादनात प्रथम क्रमांकाचे बक्षीस
- आदिवासी क्षेत्रातील इतर गरजू शेतक-यांना वेळोवेळी मदत व मार्गदर्शन